लमाल, २० जुन २००९, युद्ध
(आशिष महाबळ)
युद्ध. विराम.

इतक्यातच चाणक्य पाहुन झाले. जवळजवळ ४० तास एका आठवड्यात. इतिहासाच्या त्या उजळणीबरोबरच माझ्या युद्धावरील मतांची देखिल चाचपणी सुरु होती. खरंतर युद्ध कुणीच कुणाशी करु नये. युद्ध हा केवळ अधोगतीचाच मार्ग आहे. असे असुनही युद्धातील शौर्याच्या कथा ऐकल्या की, विपरीत परिस्थितीत विरुद्ध रचलेल्या सोंगट्यांना फसवीत लढलेले किल्ले पाहिले की मी भारावुन जातो. माझ्यात खोलवर असलेले सुप्त असे काहितरी जागृत होऊ पहातं. कारण मनुष्यस्वभावामुळे, मनुष्याच्या अहंकारामुळे, महत्वाकांक्षेमुळे, थोडक्यात ज्या कारणांमुळे मनुष्याने खाद्यशिडी (फुडचेन) पदाक्रांत केली आहे त्या कारणांमुळे अनेकदा युद्ध अपरिहार्य होतं.

मध्यंतरी अनेक सिनेमे पाहिले: झी, व्ही फौर व्हेनडेट्टा, मोटरसायकल डायरीज, भगतसिंग ई. भगतसिंगांचा तर मी अनेक वर्षांपासुन भक्त आहे, पण हे इतर चित्रपट पहातांना देखिल भान हरपायला होते. काय आहे असे त्यात? एक समान धागा म्हणजे त्यांची तत्वनिष्ठता. काहिही झाले तरी बेहत्तर, पण ध्येयापासुन ढळायचे नाही. या एका जिद्दीमुळेच अलौकीक असे मानसीक बळ अशा लोकांना सिद्ध असतं. अर्थात अलौकीक ऐवजी हेच बळ अमानवी बनलं की काय होतं हे देखील हिटलर, मुसोलिनी आदिंच्या बाबत आपण पाहिलेच आहे.

चाणक्य एक शिक्षक असल्याने, आणि शिक्षणाला, व त्याही पेक्षा गुरुला अनन्यसाधारण महत्व असल्याने त्यांचा देशाला जागवायचा मार्ग किंचीत निष्कंटंक झाला. शिक्षकाचे ते स्थान तर गेले आहेच, पण आपल्यापैकी अनेकांना लढा म्हणजे काय याबद्दल मुळिसुद्धा माहीत नाही. जर काही पाहिले असेल तर ते दुरुन, एखाद्या व्हिडिओ गेम प्रमाणे व्हर्चुअल, केवळ बॅकग्राऊंड मधिल काहीतरी. थोडक्यात काय तर आपली संवेदनशीलता नष्ट झाली आहे.

आपण जर तसेच राहु शकलो तर आनंदच आहे. सगळेच जर तसे राहु शकले तर उत्तमच. पण तसे होणार नाही. शांतता ही केवळ दोन युद्धांमधिल क्षणिकता असते. या ना त्या प्रकारच्या झमेल्यात आपल्यातील प्रत्येकजण पुढे मागे अडकणारच. (किंवा डोळे झाकुन् फिरलो नाही तर् लक्षात येतं की आत्ताही आपण कोणत्यातरी कलहात आहोतच). मग आपल्याला ठरवावे लागेल की आपण कोणत्या बाजुला आहोत. सत्याग्रह धरु शकु का? नाहीतरी या विश्वातुन जिवंत सुटका नाही. मग मनाला जे योग्य वाटते ते का करु नये? खोट्या धनाकरता, उथळ नात्यांकरता लढण्यात काय अर्थ आहे? सत्य कुणाच्या बाजुला आहे? काय केल्याने जास्त लोकांचे जीवन सुकर होणार आहे?

युद्धात पडायला घाबरण्याचे काही कारण नाही. का लढायचे, कसे लढायचे याची अनेक पारायणे झाली आहेत. फक्त अवजारं बदलताहेत. स्थिरता ही नेहमीच अस्थिर असते. वर्चस्व एंट्रोपीचेच असते. या सर्व बॅकग्राऊंडवर आपल्याला शोधायची असतात काही प्रश्नांची उत्तरे: भाडोत्री म्हणजे काय? परोपकारी मृत्यु म्हणजे काय? राष्ट्रीयता म्हणजे काय? स्वधर्म म्हणजे काय? मुक्ति म्हणजे काय? ती कशापासुन मिळवायची? का? ज्या लोकांपासुन सावध राहायला आपल्याला आपल्या पालकांनी सांगीतले होते तेच आपण बनलो आहोत हे लक्षात आले की अनेक प्रश्नांची उत्तरे मिळणे सोपे जाते.